**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

**नागपूर शहर पोलीस आयुक्तालय**

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

---

**दिनांक ०४.०५.२०२१ मंगळवार**

**(गुन्हे)**

**१) पो.स्टे. कळमणा — घरफोडी :**

दिनांक १८.०४.२०२१ चे १८.०० वा ते दिनांक ०२.०५.२०२१ चे २३.०० वा दरम्यान फिर्यादी रजनिश हिन्वेलाल पांडे वय ३२ वर्ष रा. हंसापुरी, नारायणी माता मंदीर जवळ, नागपूर यांचे पो.स्टे. कळमणा हद्दीत प्लॉट नं. ११०, ओमनगर, नागपूर येथे राहणारे मोठे भाऊ कैलास पांडे वय ३४ वर्ष हे घराला कुलूप लावून परिवारासह रिवा, मध्यप्रदेश येथे गेले असता कोणीतरी अज्ञात आरोपीने घराचे कंपाउट वॉलचे गेटचे व घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून बेडरूममधील अलमारीतील सोन्याचांदीचे दागिने असा एकुण रू १,६४,५००/— चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. कळमणा येथे पोहवा मोहन, ९२८४६४२६०८ यांनी आरोपीविरूध्द कलम ४५४,४५७,३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**२) पो.स्टे. सिताबर्डी — जबरी चोरी :**

दिनांक ०४.०५.२०२१ चे ०३.५० वा चे सुमारास फिर्यादी अक्षय किशोर मडावी वय २२ वर्ष रा. नविन फुटाळा, रसोई घराचे समोर, नागपूर हा आपला मित्रासह मोमीनपुरा येथून राहते घरी दुचाकीने जात असतांना पो.स्टे. सिताबर्डी हद्दीत बोर्ड ऑफीस चौकजवळ, सायन्स कॉलेजचे बाजुला, सिव्हील लाईन, नागपूर येथे अंदाजे २५ ते ३० वर्ष वयोगटातील ४ अनोळखी आरोपी इसमांनी फिर्यादीला थांबवून पत्ता विचारण्याचे बहाना करून फिर्यादीचे मित्राचे पॅकेट ज्यात नगदी रू ४०,१२०/—, आधार कार्ड, पॅन कार्ड, ए.टी.एम कार्ड असलेले पॅकेट जबरदस्तीने हिसकावून दुचाकीने पळून गेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. सिताबर्डी येथे पोउपनि शेख ८०८०४६१६९६ यांनी आरोपींविरूध्द कलम ३९२,३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पो.स्टे. वाठोडा :**

दिनांक ०३.०५.२०२१ चे १५.४५ वा चे सुमारास पो.स्टे. वाठोडा हद्दीत प्रजापती नगर झोपडपट्टी, नागपूर येथे राहणारे श्यामलाल इतवारीलाल यादव वय ५५ वर्ष यांनी आपले राहते घरी छताचे बल्लीला पाण्याचे पाईपने गळफास लावून आत्महत्या केली. याप्रकरणी फिर्यादी पोर्णिमा श्यामलाल यादव वय ५० वर्ष यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. वाठोडा येथे सपोउपनि काकडे, ७६६६४१६३५१ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

**(मिसींग)**

**१) हरविलेल्या इसमांचा शोध होणेबाबत :**

१) कु. वर्षा सुरेश सोकाटे वय १९ वर्ष रा. पावनगांव, शेषनाग मंदीर जवळ, पो.स्टे. कळमना, नागपूर शहर ही दिनांक २८.०४.२०२१ चे १४.३० वा चे सुमारापासून बेपत्ता आहे. शोध घेतला असता मिळून आली नाही. वर्णन — रंग सावळा, चेहरा गोल, उंची ५ फुट, बांधा सडपातळ, डोळे, काळे, केस काळे असून तीने अंगात काळी रंगाची लॅगींग पिवळया रंगाचा फ्रॉक घातलेला असून ती मराठी, हिंदी भाषा बोलते. तिचे दोन्ही कान चिपकलेले आहे.

२) रतीया उर्फ छोटी राजकुमार उईके वय १८ वर्ष रा. नवजीवन कॉलनी, मंदारदेव यांचे साईटवर, माधव नेत्रालय जवळ, पो.स्टे. धंतोली, नागपूर शहर ही दिनांक २९.०४.२०२१ चे ०८.०० वा चे सुमारापासून बेपत्ता आहे. शोध घेतला असता मिळून आली नाही. वर्णन — रंग सावळा, चेहरा लांबट, उंची ५ फुट, केस काळे, बांधा सडपातळ असून तीने अंगात हिरव्या रंगाचा फ्रॉक घातलेला असून ती हिंदी भाषा बोलते.

३) सौ. माया चंद्रकांत चालरकर वय ४० वर्ष रा. विजयालक्ष्मी पंडीत नगर, पो.स्टे. नंदनवन, नागपूर शहर या दिनांक ०२.०५.२०२१ चे १४.३० वा चे सुमारास घरून निघून गेल्या. शोध घेतला असता मिळून आल्या नाही. बेपत्ता आहे. वर्णन — रंग सावळा, चेहरा गोल, बांधा सडपातळ असून त्यांनी अंगात लाल रंगाचा सलवार सुट घातलेला असून त्या मराठी भाषा बोलतात. त्यांचे हाताचे व पायाचे बोटे लहाण आहे.

४) मंगल उर्फ वैभव देवीदास यादव वय २० वर्ष रा. प्लॉट नं. २, बाबादिपसिंग नगर, नारी रोड, पो.स्टे. कपीलनगर, नागपूर शहर हा दिनांक २६.०४.२०२१ चे ०१.०० वा ते ०५.०० वा दरम्यान घरी काही न सांगता निघून गेला. शोध घेतला असता मिळून आला नाही. बेपत्ता आहे. वर्णन — रंग सावळा, चेहरा लांबट, केस काळे, उंची ५ फुट ५ इंच, बांधा मजबुत असून तो हिंदी भाषा बोलतो. त्याचे हातावर बजरंगबली लिहीलेले आहे. त्याची मानसीक स्थिती बरोबर नाही.

५) विजय लल्लुप्रसाद केवट वय ६० वर्ष रा. नवा नकाशा, लष्करीबाग, पो.स्टे. पाचपावली, नागपूर शहर हे दिनांक २३.०४.२०२१ रोजी राहते घरून निघून गेले. शोध घेतला असता मिळून आले नाही. बेपत्ता आहे. वर्णन रंग गोरा, चेहरा लांबसर, उंची ५ फुट ७ इंच, केस काळे पांढरे, बांधा सडपातळ असून त्यांनी अंगात पांढरा रंगाचा शर्ट व चॉकलेटी रंगाचा पॅन्ट घातलेला असून त्यांना बोलता येत नाही.

६) किशन तिवारी वय ७४ वर्ष रा. श्रीराम मंदीरचे मागे, श्रीराम तोमाने यांचे घरी किरायाने पो.स्टे. मानकापूर, नागपूर शहर हे दिनांक २६.०४.२०२१ चे ११.०० वा चे सुमारास घरून फिरण्याकरीता गेले ते घरी परत आले नाही. शोध घेतला असता मिळून आले नाही. बेपत्ता आहे. वर्णन — रंग गोरा, चेहरा गोल, उंची ५ फुट ५ इंच, केस काळे पांढरे, बांधा सडपातळ असून त्यांनी अंगात पांढरा रंगाचा शर्ट व काळया रंगाचा पॅन्ट घातलेला असून ते हिंदी भाषा बोलतात. त्यांचे डाव्या हातावर किशन तिवारी असे नाव गोंदलेले आहे.


वर्षा


रतीया


माया


मंगल


विजय


किशन

वरील छाया चित्रावरून ओळखणा—यांनी संबंधीत पो.स्टे.ला संपर्क साधावा.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर